|| अंतरी पेटवू ज्ञानज्योत ||
# कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव
# Kavayitri Bahinabai Chaudhari North Maharashtra University, Jalgaon
'A' Grade NAAC Re-Accredited (3rd Cycle)

## संलग्नता विभाग

जा.क्र.कबचौउमवि/५/ संलग्नीत महा.प्रस्ताव-२०२१.२२/२४८/२०२० दि. १५/०९/२०२०

**अत्यंत महत्वाचे**

**परिपत्रक**

**विस्ताराचे (Extension) प्रस्ताव सादर करणेसाठी इच्छुक असलेल्या विद्यापीठाशी संलग्नीत महाविद्यालये/मान्यताप्राप्त परिसंस्था यांचेकरीता**

प्रति,
मा.अध्यक्ष/संचालक मंडळ आणि कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाशी संलग्नीत असलेल्या सर्व महाविद्यालयांचे मा.प्राचार्य/ मान्यताप्राप्त परिसंस्थाचे मा.संचालक यांना -

विषय :- शैक्षणिक वर्ष २०२१-२२ पासून महाविद्यालयांमध्ये नवीन अभ्यासक्रम, विद्याशाखा, विषय, अतिरीक्त तुकडी, विद्यार्थी संख्या वाढ, सेकंड शिप्ट इत्यांदि सुरु करणेसाठी विस्ताराचे (Extension) प्रस्ताव/अर्ज सादर करणेबाबत..

संदर्भ :- ०१) महाराष्ट्र शासनाच्या उच्च व तंत्रशिक्षण विभागाकडील शासन निर्णय क्र. एनजीसी २०१७/(२०८/१७)/मशि-४, दि. १३/०९/२०१७
०२) महाराष्ट्र शासनाच्या उच्च व तंत्रशिक्षण विभागाकडील शासन निर्णय क्र. एनजीसी-२०१७/(२९/१७)/मशि-४, दि. १५/०९/२०१७

महोदय/महोदया,

महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम २०१६ मधील कलम १०९ नुसार संलग्नीत महाविद्यालये/मान्यताप्राप्त परिसंस्थांमध्ये सुरु करावयाच्या नवीन विद्याशाखा, अभ्यासक्रम, विषय, अतिरीक्त तुकडी, विद्यार्थी संख्या वाढ, सेकंड शिप्ट इत्यांदिसाठी विस्ताराचे प्रस्ताव/अर्ज मागविण्यात येत आहेत. उपरोक्त संदर्भिय शासन निर्णयामध्ये तसेच नवीन मान्यतांसाठी आवश्यक निकषां संदर्भात शासनाकडून प्राप्त होणा-या आदेशांमध्ये नमूद केलेल्या कार्यपध्दतीनुसार आणि महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठे अधिनियम २०१६ च्या तरतुदींनुसार प्राप्त अर्जांवर विद्यापीठाव्दारे योग्य ती कार्यवाही करुन पात्र प्रस्ताव/अर्ज विद्यापीठाच्या शिफारशींसह शासनाकडे मान्यतेसंदर्भात पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी अग्रेषित करण्यात येतील आणि उर्वरीत अर्जांवर प्रचलित नियमानुसार कार्यवाही करण्यात येईल.

**उपरोक्त संदर्भात आपणास कळविण्यात येते की:-**

०१) सर्व संलग्नीत महाविद्यालये/मान्यताप्राप्त परिसंस्थांनी विषयांकित अर्ज भरणेपूर्वी प्रथम आपल्या महाविद्यालयाची/मान्यताप्राप्त परिसंस्थेची Academic Information आणि Teachers's Information ऑनलाईन प्रणालीमार्फत काळजीपूर्वक भरुन किंवा अद्ययावत करुन submit करावी व send to university करावी. त्याशिवाय आपणास शैक्षणिक वर्ष २०२१-२२ करिताचे ऑनलाईन अर्ज भरता येणार नाहीत, याची दखल घेवून कृपया सदर माहिती व्यवस्थितरीत्या भरुन ती ऑनलाईन प्रणालीव्दारे Send करावी. ऑनलाईन प्रणालीव्दारे माहिती भरतांना/अद्ययावत करतांना **आपण यापूर्वी नोंदणी केलेला मोबाईल क्रमांक जर बदलला असेल, तर त्यासंदर्भातील बदल करणे आवश्यक आहे. असा बदल न केल्यास आपणांस ऑनलाईन प्रणालीव्दारे कोणताही मॅसेज प्राप्त होणार नाही व त्यास आपण सर्वस्वी जबाबदार रहाल, याची कृपया नोंद घेऊन सदर बाब आपल्या महाविद्यालयातील संबंधित शिक्षक-शिक्षकेतर कर्मचा-यांना अवगत करण्यात यावी.**

**(कृ.मा.प.)**

२) मुद्या क्र.०१ मध्ये नमूद केलेली महाविद्यालयाची माहिती तसेच शिक्षकांची माहिती भरणे/अद्यावत करणेकरीता आवश्यक असणा-या **<u>दोन्ही links सुरु करण्यात आलेल्या असून, हया दि.३०/०९/२०२० पर्यंतच सुरु राहतील,</u>** याची कृपया नोंद घ्यावी. महाविद्यालयाने Academic Information या Link मधील माहिती तसेच आपणांस लागू असलेल्या प्रस्तावाची माहिती अत्यंत काळजीपूर्वक भरणे आवश्यक असून, भरण्यात आलेल्या माहितीची आपल्या स्तरावर प्रिंट घेऊन त्याची खातरजमा करावी. तद्नंतर सदरची माहिती submit करुन Sent to University करावी.

विद्यापीठाच्या असे निदर्शनास आले आहे की, बऱ्याचदा भरलेल्या माहितीची खातरजमा न करता अपूर्ण भरलेली/अद्ययावत न केलेली माहिती ऑनलाईन प्रणालीमार्फत submit करुन Sent to University करण्यात येते. त्यामुळे वेळोवेळी सदरची माहिती पुन:श्च भरणेसाठी/अद्ययावत करणेसाठी Academic Information/ Proposal Link, unlock करावी लागते. त्यामुळे तांत्रिक अडचणी निर्माण होतात. (उदा- अपूर्ण भरलेल्या माहितीची हार्ड कॉपी सादर करण्यात येते. तथापि, unlock केल्यानंतरची सुधारित माहिती ऑनलाईन प्रणालीमार्फत Sent to University केली जात नाही व सुधारीत हार्ड कॉपी सादर करण्यात येत नाही) तसेच संभ्रम निर्माण होतो. तरी याबाबत आपणांस कळविण्यात येते की, आपण भरलेल्या/अद्ययावत केलेल्या माहितीची खातरजमा करुनच त्याबाबत पुढील कार्यवाही करावी अन्यथा, ज्या त्या स्टेजला पुन:श्च Unlock करून ऑनलाईन प्रणालीद्वारे भरलेल्या माहितीत सुधारणा/दुरुस्ती करणेसाठी रु. ५००/-(रुपये पाचशे मात्र) इतकी रक्कम दंडाच्या स्वरुपात आकारण्यात येईल याचीही कृपया नोंद घ्यावी.

३) विद्यापीठाच्या परिपत्रक क्र.उमवि/५/६७९/२०१२, दिनांक ०१/१०/२०१२ मध्ये नमूद केलेल्या तक्त्यातील रकान्यांप्रमाणे आपणांस लागू असलेले नोंदणी शुल्क व प्रक्रिया शुल्क प्रस्तावा अगोदर भरणे आवश्यक आहे. भरलेला प्रस्ताव/अर्जाची प्रत, आवश्यक ते कागदपत्र व संलग्नता शुल्क, नोंदणी शुल्क व प्रक्रिया शुल्क विद्यापीठाच्या संलग्नता विभागास दिलेल्या वेळापत्रकानुसार किंवा असाधारण परिस्थितीत दि.३०/०९/२०२० पावेतो कार्यालयीन वेळेत सादर करता येईल.

४) **संलग्नता शुल्काबाबतचे परिपत्रक, संलग्नता शुल्काचा तक्ता आदि माहिती ऑनलाईन ॲफिलिएशन (OAASIS) मधील Downloads या Link वर तसेच विद्यापीठाच्या संकेतस्थळावर देखील उपलब्ध आहे.**

५) ज्या शैक्षणिक संस्थांना आणि ज्या कार्यरत महाविद्यालयांना, महाविद्यालयात सध्या सुरु असलेले विद्याशाखा / अभ्यासक्रम / विषय / तुकडी /विद्यार्थी संख्या/सेकंड शिफ्ट या व्यतिरीक्त नवीन विद्याशाखा, अभ्यासक्रम/विषय व नवीन अतिरीक्त तुकडी, विद्यार्थी संख्या वाढ, सेकंड शिफ्ट इत्यांदिंचा शैक्षणिक वर्ष २०२१-२२ पासून **<u>विस्तार</u>** करावयाचा असेल, अशा महाविद्यालयांनी विस्तारासंदर्भातील विहीत नमुन्यातील अर्ज स्वतंत्रपणे ऑनलाईन प्रणालीव्दारे भरावयाचे असून, ऑनलाईन पध्दतीने माहिती भरल्यानंतर त्याची प्रिंट घेऊन सदर प्रस्ताव **<u>०४ प्रतीत आवश्यक ते साक्षांकित केलेले कागदपत्र, संलग्नता शुल्क, नोंदणी शुल्क व प्रक्रिया शुल्क</u>** विद्यापीठाच्या संलग्नता विभागास दिलेल्या वेळापत्रकानुसार किंवा असाधारण परिस्थितीत दि.३०/०९/२०२० पावेतो कार्यालयीन वेळेत सादर करावेत.

उदा. एखाद्या महाविद्यालयास नवीन अभ्यासक्रम सुरु करावयाचा असेल आणि त्याचबरोबर नवीन तुकडीची मागणी करावयाची असेल अशा वेळी सदर महाविद्यालयाने दोघेही प्रस्तावांची हार्ड कॉपी स्वतंत्रपणे वेगवेगळया फाईल्समध्ये आवश्यक त्या साक्षांकित केलेल्या कागदपत्रांसह सादर करणे आवश्यक आहे. कृपया असे विविध विस्ताराचे प्रस्ताव/अर्ज कोणत्याही परिस्थितीत एकत्रीत करु नयेत.

*<u>संलग्नीत महाविद्यालयांनी/मान्यताप्राप्त परिसंस्थांनी वरील विस्ताराचे अर्ज सादर करतांना संदर्भिय शासन निर्णयात नमूद केलेल्या बाबींची पूर्तता करणे अनिवार्य असून, अपूर्ण भरलेले अर्ज, अपूर्ण कागदपत्र, साक्षांकित न केलेले कागदपत्र वा तत्सम बाबी आढळल्यास अशा अर्जावर विद्यापीठामार्फत कार्यवाही केली जाणार नाही, तसेच याबाबतीत कोणताही पत्रव्यवहार केला जाणार नाही, याची कृपया नोंद घ्यावी.</u>*

**(कृ.मा.प.)**

६) ज्या संलग्नीत महाविद्यालयांना शैक्षणिक वर्ष २०२०-२१ करीता महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठे अधिनियम २०१६ मधील कलम १०९(८) नुसार शासनाकडून जलदगती पध्दतीने तुकडी मान्यता प्राप्त झाली असेल, व त्यास विद्यापीठाचे संलग्नीकरण मान्य झाले असेल त्यांनी सदर तुकडीबाबत पुढील शैक्षणिक वर्षाकरीता नियमित अतिरीक्त तुकडीकरीता शासनाने विहीत केलेल्या निकष व कार्यपध्दती नुसार विद्यापीठाकडे नव्याने अर्ज सादर करुन नियमित अतिरिक्त तुकडीस शासन मान्यता घेणे आवश्यक आहे. अशा तुकडीस पुढील शैक्षणिक वर्षामध्ये नियमित अतिरिक्त तुकडी म्हणून शासन मान्यता प्राप्त न झाल्यास सदर तुकडीमध्ये प्रथम वर्षाकरीता विद्यार्थी प्रवेश करता येणार नाहीत.(तथापि, जलद गती पध्दतीमध्ये मान्यता दिलेली अतिरिक्त तुकडी नैसर्गिक विस्ताराने पुढे चालू राहील)

७) उच्च व तंत्र शिक्षण आणि सेवायोजन विभागाच्या दिनांक १९ जून, १९९५ रोजीच्या शासन निर्णयात **विद्यार्थी संख्येबाबत निकषांचे व नियमांचे काटेकोरपणे पालन होण्याच्यादृष्टीने शैक्षणिक वर्ष २०२०-२१ पासून संलग्नीत महाविद्यालये/मान्यताप्राप्त परिसंस्थांना विद्यापीठाने जो अभ्यासक्रम मान्य केलेला असेल त्या अभ्यासक्रमाच्या मंजूर विद्यार्थी संख्येइतकेच प्रवेश करावयाचे आहेत. संलग्नीत महाविद्यालये/मान्यताप्राप्त परिसंस्थांनी कोणत्याही परिस्थितीत, विद्यापीठाने विद्यार्थी प्रवेशक्षमता मान्य केल्याशिवाय शैक्षणिक वर्ष २०२१-२२ करीता विद्यार्थी प्रवेशित करु नयेत. शैक्षणिक वर्ष २०२१-२२ साठी कोणत्याही सबबीवर मंजूर विद्यार्थी संख्येपेक्षा वाढीव प्रवेश करण्यांस विद्यापीठामार्फत मान्यता दिली जाणार नसल्याने, आपणांस हव्या असलेल्या वर्गासाठी आपण शैक्षणिक वर्ष २०२१-२२ करिता विस्तारांतर्गत अतिरीक्त तुकडीकरिता प्रस्ताव सादर करावेत, अशी विनंती-वजा-आवाहन करण्यात येत आहे. तसेच याबाबत न्यायालयीन बाब उद्‌भवल्यास त्यास विद्यापीठ जबाबदार राहणार नाही.**

८) **विद्यापीठाशी संलग्नीत असलेल्या सर्व अनुदानित, विना अनुदानित आणि कायम विना अनुदानित महाविद्यालयांनी विस्ताराचा प्रस्ताव सादर करणेपूर्वी त्यांना लागू असलेले नॅक/एन.बी.ए. तसेच त्याचे पुनर्मुल्यांकन केलेले असणे आवश्यक तथा बंधनकारक राहील. तसेच संबंधीत महाविद्यालयांनी यु.जी.सी./शासन/विद्यापीठ यांचे अटी, शर्ती व निकष पूर्ण करणे बंधनकारक राहील.**

९) **शैक्षणिक वर्ष २०२०-२०२१ मध्ये कला विद्याशाखेत बी.ए. अभ्यासक्रम सुरु झाला असेल तर शैक्षणिक वर्ष २०२१-२०२२ मध्ये व्दितीय वर्ष कला वर्गाच्या विशेष (स्पेशल) स्तरावरील विषयांसाठी विषय विस्ताराचा स्वतंत्र प्रस्ताव प्रस्ताव सादर करावा.**

१०) **शैक्षणिक वर्ष २०२०-२०२१ मध्ये विज्ञान विद्याशाखेतील बी.एस्सी. अभ्यासक्रम सुरु झाला असेल तर शैक्षणिक वर्ष २०२१-२२ मध्ये व्दितीय वर्ष विज्ञान वर्गाच्या मराठी, इंग्रजी, उर्दु व हिंदी या सामान्य स्तरावर नव्याने सुरू होणाऱ्या विषयांसाठी विषय विस्ताराचा प्रस्ताव स्वतंत्रपणे सादर करावा. तृतीय वर्ष विज्ञान वर्गाच्या विशेष स्तरावरील विषयांच्या विस्ताराचा प्रस्ताव सादर करावा.**

११) **व्यावसायिक अभ्यासक्रमाशी निगडीत महाविद्यालया संदर्भात AICTE Approval Process Handabook हे साधरणत: जानेवार/फेब्रुवारी मध्ये त्यांचे संकेतस्थळावर प्रसिध्द होत असल्यामुळे त्यानुसार जे अभ्यासक्रम (तसेच विलनीकरण, पदवीका महाविद्यालयामध्ये पदवी अभ्यासक्रम) सुरु करावयाचे असतील अशा महाविद्यालयांना देखील याबाबत प्रस्ताव अथवा अभ्यासक्रम सुरु करणार असल्याचे प्रस्तावित असून, तसा प्रस्ताव AICTE ला सादर करणार आहोत, अशा आशयाचे पत्र विद्यापीठाला देणे अनिवार्य राहील. त्यानंतर AICTE ला प्रस्ताव सादर करतेवेळी विद्यापीठाचे ना हरकत प्रमाणपत्र (NOC) घेणे बंधनकारक राहील.**

तरी आपणास कळविण्यांत येते की, आपण आपले अर्ज ऑनलाईन प्रणालीमार्फत भरुण आवश्यक त्या कागदपत्रांसह अर्जाची हार्ड कॉपी (सदर परिपत्रकात नमूद केलेल्या प्रतीत) दिलेल्या वेळापत्रकानुसार किंवा असाधारण परिस्थितीत दि.३०/०९/२०२० पावेतो संलग्नता व इतर लागू असलेल्या शुल्कासह विद्यापीठाच्या संलग्नता विभागात सादर करावी, ही विनंती. आपल्या महाविद्यालयाचा/मान्यताप्राप्त परिसंस्थेचा ऑनलाईन प्रणालीमार्फत परिपूर्ण भरलेला अर्ज/प्रस्ताव, आवश्यक त्या साक्षांकित केलेल्या कागदपत्रांसह व संलग्नता शुल्कासह वेळापत्रकातील दिनांकापूर्वी तयार असल्यास, आपण असे अर्ज/प्रस्ताव नमूद केलेल्या दिनांका पूर्वीसुध्दा सादर करु शकतात.

उपरोक्त नमूद केलेले अर्ज ऑनलाईन पध्दतीने सादर करण्यासाठी विद्यापीठाच्या www.nmu.ac.in या संकेतस्थळावर Homepage वरील R & D या टॅग मधील Affiliation या मेनूवर pointer ठेऊन त्यातील Online Affiliation या Link वर click करुन Proposal Guidelines 2020-21 येथे Click करावे. सदर Link मध्ये आवश्यक त्या सर्व सूचना देण्यात आलेल्या असून त्या सूचनेनुसार ऑनलाईन पध्दतीने अर्ज सादर करावेत. आपल्या माहितीसाठी सदर ठिकाणी Helpline मॉडयुल देखील देण्यात आलेली आहे. तसेच शासनाने यासंदर्भात वेळोवेळी निर्गमित केलेले शासन निर्णय, संलग्नता शुल्काचा तक्ता, प्रक्रिया शुल्काचे परिपत्रक व इतर सविस्तर माहिती आणि संबंधित परिपत्रके Important G.R/ Ciculars तसेच Other G.R/Circulars या Link वर उपलब्ध आहेत.

**(कृ.मा.प.)**

**ऑनलाईन प्रणालीव्दारे माहिती भरतांना वा आपणांस काही अडचणी असल्यास सदर अडचणींचे निराकरण करण्यासाठी वर नमूद केलेल्या support@onlinekbcnmu.org.in वर helpline भ्रमणध्वनी क्रमांक 08828996668/69 देण्यात आलेला असून आपण त्या ठिकाणी देण्यांत आलेल्या दूरध्वनी/मोबाईलवर संपर्क साधल्यास आपल्या अडचणींचे तात्काळ निराकरण केले जाईल.**

तसेच विस्ताराचे प्रस्ताव सादर करण्यासाठी वर नमूद केलेल्या Link मधील सूचना तसेच या पत्रासोबत जोडलेल्या सूचनांचे अवलोकन करावे ही विनंती. विस्ताराचे प्रस्ताव विद्यापीठात सादर करण्याची मुदत, महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम २०१६ चे कलम १०९ नुसार दि. ३० सप्टेंबर अशी आहे. तथापि, अनेक महाविद्यालयांचे/ परिसंस्थांचे/संस्थांचे प्रतिनिधीं सदर महिन्याचे शेवटी प्रस्ताव सादर करण्यासाठी उपस्थित होत असल्यामुळे, प्रस्ताव स्विकारतांना घाई होवून प्रस्तावात पूर्णता अथवा त्रूटी राहू शकतात. त्यामुळे आपल्या अर्जावर योग्यरीतीने कार्यवाही होण्यासाठी तसेच आपले परिपूर्ण प्रस्ताव शासनास सादर करण्यासाठी कामकाजात सुसूत्रता येण्याच्या दृष्टीने खाली नमूद केलेल्या वेळापत्रकाप्रमाणे किंवा तत्पूर्वी विद्यापीठातील संलग्नता विभागास सादर करावेत, ही विनंती.

*** विस्ताराचे (Extension) प्रस्ताव सादर करण्यासाठी वेळापत्रक ***

| अ.क्र. | दिनांक व वार | विद्याशाखा | जिल्हा | तालुका |
|---|---|---|---|---|
| 01 | बुधवार 23/09/2020 | शिक्षणशास्त्र महाविद्यालय विस्ताराचे प्रस्ताव | धुळे व नंदुरबार | सर्व तालुके |
| | | कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय विस्ताराचे प्रस्ताव, नवीन कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयांचे प्रस्ताव | नंदुरबार | अक्कलकुवा, धडगांव, नंदुरबार. |
| | | | जळगांव | अमळनेर, पारोळा, एरंडोल, धरणगांव, भडगांव. |
| 02 | गुरुवार 24/09/2020 | मान्यताप्राप्त परिसंस्था विस्ताराचे प्रस्ताव, नवीन परिसंस्थांचे प्रस्ताव | धुळे व नंदुरबार | सर्व तालुके |
| 03 | शुक्रवार 25/09/2020 | शिक्षणशास्त्र महाविद्यालय विस्ताराचे प्रस्ताव | जळगांव | सर्व तालुके |
| | | कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय विस्ताराचे प्रस्ताव, नवीन कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयांचे प्रस्ताव | नंदुरबार | नवापूर, शहादा, तळोदा. |
| | | | जळगांव | चाळीसगांव, चोपडा, पाचोरा. |
| 04 | शनिवार 26/09/2020 | मान्यताप्राप्त परिसंस्था विस्ताराचे प्रस्ताव, नवीन महाविद्यालयांचे प्रस्ताव | जळगांव | सर्व तालुके |
| 05 | सोमवार 28/09/2020 | अभियांत्रिकी महाविद्यालय विस्ताराचे प्रस्ताव | जळगांव, धुळे व नंदुरबार | सर्व तालुके |
| | | विधी, समाजकार्य, ललितकला महाविद्यालय व विस्ताराचे प्रस्ताव, नवीन महाविद्यालयांचे प्रस्ताव | जळगांव, धुळे व नंदुरबार | सर्व तालुके |
| 06 | मंगळवार 29/09/2020 | कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय विस्ताराचे प्रस्ताव, नवीन महाविद्यालयांचे प्रस्ताव | धुळे | साक्री, शिंदखेडा, शिरपूर. |
| | | | जळगांव | बोदवड, जामनेर, मुक्ताईनगर, रावेर, यावल. |
| 07 | बुधवार 30/09/2020 | औषधनिर्माणशास्त्र महाविद्यालय विस्ताराचे प्रस्ताव, नवीन महाविद्यालयांचे प्रस्ताव | जळगांव, धुळे व नंदुरबार | सर्व तालुके |
| | | कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय विस्ताराचे प्रस्ताव | धुळे | धुळे |
| | | | जळगांव | जळगांव, भुसावळ. |

**(प्रा.डॉ.बी.व्ही.पवार)**
प्र.कुलसचिव
कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ,जळगाव

सोबत : अर्ज सादर करणेसाठी आवश्यक त्या सूचना व माहिती.

**(कृ.मा.प.)**

## ऑनलाईन प्रणालीव्दारे अर्ज सादर करणेसाठी आवश्यक त्या महत्वाच्या सूचना व माहिती

१) *महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम २०१६ मधील कलम ९७(५)(ग) मध्ये नमूद केल्यानुसार, महाविद्यालय विकास समिती, नवीन विद्याविषयक पाठयक्रम सुरु करण्याबाबत आणि अतिरिक्त अध्यापक व प्रशासकीय पदांची निर्मिती करण्याबाबत व्यवस्थापनाकडे सूचना करील, असे नमूद केलेले आहे. त्यानुसार महाविद्यालयातील महाविद्यालय विकास समितीचा अहवाल आणि समितीने केलेल्या शिफारशी बाबतचा ठराव अर्जासोबत जोडणे आवश्यक राहील.*

२) Proposal Guidelines २०२१-२२ मध्ये विविध प्रस्तावांच्या Links देण्यात आलेल्या आहेत. **आपल्या महाविद्यालयास /परिसंस्थेस ज्या करीता प्रस्ताव सादर करावयाचा आहे त्या प्रस्तावाच्या Link वर click करुन ऑनलाईन प्रणालीमार्फत प्रस्ताव अर्जातील माहिती भरता येईल.** ऑनलाईन अर्ज सादर करतेवेळी परिपत्रकात नमूद केलेल्या Link मधील सूचनांचे अवलोकन केल्यानंतरच अर्ज भरावा. अर्ज भरतेवेळी आवश्यक ते दस्तऐवज जवळ ठेवल्यास सदर अर्जातील माहिती भरणे सुकर होईल.

३) आपणांस लागू असलेल्या अर्जाची माहिती आपण ऑनलाईन प्रणालीव्दारे भरावी व त्याची A-4 साईज पेपरवर एकाच बाजूने प्रिंट घेऊन (परिपत्रकात नमूद केलेल्या प्रतीत) त्यासोबत आवश्यक ते साक्षांकित केलेले कागदपत्र, सहपत्र, विहीत केलेल्या संलग्नता शुल्कासह प्रस्ताव/अर्ज वेळापत्रकाप्रमाणे सादर करावा. या प्रक्रियेव्दारे जमा करण्यांत येणा-या शुल्काचा (प्रक्रिया/संलग्नता शुल्क) धनाकर्ष वित्त व लेखा अधिकारी, क.ब.चौ.उ.म.वि.जळगाव (Finance & Accounts Officer, K.B.C.N.M.U., Jalgaon) यांचे नावे राष्ट्रीयकृत बॅंकेचा असावा.

४) महाविद्यालय/मान्यताप्राप्त परिसंस्थांनी प्रत्येक प्रस्तावाच्या स्वतंत्र ०४ फाईल्स पाठवाव्यात. उदाहरणार्थ,
(१) नवीन अभ्यासक्रमाच्या विस्तारासाठी स्वतंत्र फाईल - ०४
(२) अतिरीक्त तुकडी विस्तारासाठी स्वतंत्र प्रस्तावाची फाईल- ०४
(३) नवीन विषय विस्तारासाठी स्वतंत्र प्रस्तावाची फाईल- ०४
(४) विद्यार्थी संख्या वाढ प्रस्ताव फाइल- ०४
(५) नवीन विद्याशाखा विस्ताराचा प्रस्ताव फाईल - ०४
(६) सेकंड शिप्ट प्रस्ताव -०४

उपरोक्त फाईलमध्ये ऑनलाईन पध्दतीने भरलेली तपासणी सूची, प्रस्ताव अर्जाची प्रत व त्यानंतर साक्षांकित केलेले कागदपत्र/सहपत्र जोडावीत. (संदर्भिय शासन निर्णयात नमूद केल्याप्रमाणे व संकेतस्थळावरील ऑनलाईन अर्जात तसेच तपासणी सूचीत नमूद केलेले) धनाकर्ष हा अर्जाच्या वर टाचणीने जोडावा.

५) ए.आय.सी.टी.ई संबंधित असलेल्या **एम.बी.ए./एम.सी.ए.** या अभ्यासक्रमांचा नव्याने विस्तार करावयाचा असेल तर, असे विस्ताराचे प्रस्ताव, इतर अभ्यासक्रमांच्या प्रस्तावासोबत न पाठविता सदर अर्ज ऑनलाईन पध्दतीने स्वतंत्रपणे सादर करावा व त्यासोबत आवश्यक ती साक्षांकित केलेल कागदपत्रे स्वतंत्र ०५ फाईलमध्ये द्यावीत.

६) आपला अर्ज अचूक व परिपूर्णपणे सादर करण्याच्यादृष्टीने महाविद्यालयातील/परिसंस्थेतील ज्या कर्मचारी/प्रतिनिधींना अर्जाबाबत सखोल माहिती आहे, अशाच कर्मचारी/प्रतिनिधींना अर्ज सादर करतेवेळी समक्ष पाठविणे आवश्यक आहे.

(कृ.मा.प.)

७) विस्ताराच्या कोणत्याही प्रकारचा प्रस्ताव/अर्ज शासनास सादर करतेवेळी, प्रस्तावासोबत आपल्या संस्थेमध्ये असलेल्या सोयी-सुविधांचे व कर्मचारी/शिक्षक यांच्या विषयांचे व्हिडीओ चित्रीकरण असलेली V.C.D. सादर करणे बंधनकारक आहे. त्यामुळे विद्यापीठातर्फे ज्या वेळी तज्ञ समितीची नियुक्ती करण्यांत येईल, त्या समितीच्या भेटीच्या दिवशी व वेळी सदर समिती सदस्यांच्या उपस्थितीच्या व तपासणीच्या चित्रिकरणासह, आपल्या संस्थेमध्ये असलेल्या सोयी-सुविधांचे व कर्मचारी/शिक्षक यांच्या विषयीचे व्हीडीओ चित्रीकरण असलेली V.C.D. दोन प्रतीत विद्यापीठास स्वतंत्रपणे सादर करावी. सदर VCD मध्ये संस्थेचे नांव व महाविद्यालयाचे नांवाचे सुरुवातीपासून शेवटपर्यंत scrolling टाकावा.

८) **प्रक्रिया शुल्क भरल्यानंतर ऑनलाईन प्रणालीमार्फत अर्ज/प्रस्ताव भरला म्हणजे विद्यापीठास अर्ज/प्रस्ताव सादर केला असा त्याचा अर्थ होणार नाही. तर ऑनलाईन प्रणालीमार्फत परिपूर्ण स्वरुपात भरलेल्या अर्जाची हार्ड कॉपी आवश्यक त्या साक्षांकित केलेल्या कागदपत्रांसह व संलग्नता शुल्कासह विद्यापीठाच्या संलग्नता विभागास जमा करुन त्याची नोंद घेतल्यानंतरच अर्ज/प्रस्ताव सादर करण्यात आलेला आहे, असे समजण्यात येईल.**

## *खाजगी कौशल्य शिक्षण प्रदाता परिसंस्थांना प्रस्ताव सादर करण्यासाठीच्या सूचना*

अ) ***महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम २०१६ मधील कलम ११२ नुसार खाजगी कौशल्य शिक्षण प्रदाता परिसंस्थांना मान्यता देण्याच्या कार्यपध्दतीच्या अनुषंगाने खाजगी कौशल्य शिक्षण प्रदाता परिसंस्थांचे प्रस्ताव विद्यापीठामार्फत स्विकारण्यात येतील.***

ब) ***खाजगी कौशल्य शिक्षण प्रदाता परिसंस्थांचे प्रस्ताव सादर करण्यासाठी Application Fee Rs.2500/- Profile Fee Rs.2500/- आकरण्यात येईल.***

क) ***खाजगी कौशल्य शिक्षण प्रदाता परिसंस्थांचे प्रस्ताव ऑफलाईन स्विकारण्यात येतील.***

तरी संबंधित शैक्षणिक संस्थांनी, महाविद्यालयांनी/परिसंस्थांनी उपरोक्त नमूद केलेल्या सर्व सूचनांचे तंतोतंत पालन करुन त्यानुसार अर्ज तयार करुन सादर करावेत. विलंबाने पोहोचणारे प्रस्ताव व शुल्क, कोणत्याही परिस्थितीत स्विकारले जाणार नाहीत, याची कृपया नोंद घ्यावी.

**(प्रा.डॉ.बी.व्ही.पवार)**
प्र.कुलसचिव
कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव

**सोबत : अर्ज सादर करणेसाठी आवश्यक त्या सूचना व माहिती.**

सद्यस्थितीत कोविड-19 चा प्रादुर्भाव लक्षात घेता, महत्वाची सूचना:-

01) कृपया प्रस्ताव सादर करतेवेळी महाविद्यालय/परिसंस्थेचे एकच प्रतिनिधी (प्रस्तावाची प्रक्रिया माहिती असलेला) विद्यापीठात प्रत्यक्ष उपस्थित रहाणे अनिवार्य राहील.

02) प्रस्ताव सादर करतेवेळी प्रस्तावाच्या फाईल्स सॅनिटाईझ करणे आवश्यक आहे. त्यासाठी सॅनिटाईझर बॉटल सोबत आणावी व फाईल्स सॅनेटाईझ करुन संबंधितांकडे सुपूर्द करावे.

**प्रत माहिती व कार्यवाहीसाठी:-**

मा.प्र.वित्त व लेखाधिकारी, कबचौउमवि, जळगाव

**प्रत माहितीसाठी:-**

01) मा.कुलगुरु कार्यालय, कबचौउमवि, जळगाव
02) मा.प्र-कुलगुरु कार्यालय, कबचौउमवि, जळगाव
03) मा.कुलसचिव कार्यालय, कबचौउमवि, जळगाव
04) संचालक, परीक्षा व मूल्यमापन मंडळ, कबचौउमवि, जळगाव